# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द)

## ता. आंबेगाव, जि. पुणे - ४१२४०५

# संस्थेतील उपहारगृह चालविणे करिता निविदा दस्तावेज

## २०२२-२३

## निविदे संबंधीच्या महत्वाच्या तारखा

| अ.क्र. | कार्य विवरण | अंतिम दिनांक व वेळ |
|---|---|---|
| १ | निविदा प्रकाशित करणे | दि. २१.१२.२०२२ (दुपारी १२.०० वाजता ) |
| २ | संकेतस्थळावर निविदा उपलब्ध करणे | दि. २१.१२.२०२२ (दुपारी १२.०० वाजता ) |
| ३ | निविदा सादर करण्याचा सुरवातीचा दिनांक | दि. २१.१२.२०२२ (दुपारी ४.०० वाजता ) |
| ४ | निविदा पूर्व बैठक दिनांक (इच्छुक निविदाकारांकारिता) | दि.०२.०१.२०२३ (सकाळी ११.०० वाजता) |
| ५ | निविदा पूर्व बैठक स्थळ | महाविद्यालयाच्या प्रशासकीय इमारतीतील सभागृह |
| ६ | निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक | दि.०४.०१.२०२३ (दुपारी ५.०० वाजेपर्यंत ) |
| ७ | तांत्रिक निविदा छाननी दिनांक | दि.०५.०१.२०२३ (दुपारी ३.०० वाजता ) |
| ८ | वाणिज्यिक निविदा उघडणे | दि.०७.०१.२०२३ (दुपारी ३.०० वाजता ) |

## निविदा शुल्क व बयाना रक्कम भरण्याची पद्धती

| अ.क्र. | शुल्क | रक्कम भरण्याची पद्धती |
|---|---|---|
| १ | निविदा शुल्क | निविदा शुल्क रु. १००/- (नापरतावा) परिशिष्ट ३ मध्ये दर्शविल्या प्रमाणे संस्थेस ऑनलाईन (Online) भरावे. Receipt copy लिफाफा क्रमांक- १ मध्ये द्यावा. |
| २ | बयाना रक्कम | बयाना रक्कम रु. २०००/- (परतावा) धनाकर्ष (DD) च्या स्वरुपात लिफाफा क्रमांक- १ मध्ये द्यावा. तो खालील नावाने असावा.<br><br>**प्राचार्य , शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय अवसरी (खुर्द)**<br>**( धनाकर्ष (DD) मंचर येथील बँकेत वठणारा असावा )**<br><br>**The Principal, Government College of Engineering and Research, Avasari (Khurd)**<br>**Payable at Manchar** |

<u>निविदा पत्रक</u>

# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द)

## महाविद्यालयातील उपहारगृह कंत्राटी पद्धतीने चालविण्यास देणेकरिता अटी व शर्ती

## भाग: "१"

**विषय : शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) या संस्थेतील उपहारगृहासाठी सेवा पुरविण्याबाबत**

### अभिव्यक्ती स्वारस्य / निविदा

शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द)या संस्थेतील विद्यार्थी संख्या अंदाजे १७०० व अधिकारी/कर्मचारी यांची अंदाजे संख्या १५० आहे. त्याकरिता उपहारगृह सेवा पुरविण्याबाबत अनुभवी कंत्राट दाराकडून अभिव्यक्ती स्वारस्य/ निविदा मागविण्यात येत आहे. निविदेबाबतची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | तपशील | माहिती |
|---|---|---|
| १ | कोऱ्या निविदेची किंमत | रु. १००/- (नापरतावा) |
| २ | बिनव्याजी बयाना रक्कम | रु. २,०००/- (परतावा) |
| ३ | बिनव्याजी सुरक्षा ठेव रक्कम | रु. १,००,०००/- |
| ४ | निविदेचा सादर करण्याचा कालावधी | दि. २१/१२/२०२२ ते दि. ०४.०१.२०२३ (उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दि. १ डिसेंबर २०१६ मधील तरतुदीनुसार) |
| ५ | निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | दि.०४.०१.२०२३ (दुपारी ५.०० वाजेपर्यंत ) |
| ६ | निविदा पूर्व बैठक दिनांक (इच्छुक निविदाकारांकारिता) | दि. ०२.०१.२०२३ (सकाळी ११.०० वाजता) महाविद्यालयाच्या प्रशासकीय इमारतीतील सभागृह |
| ७ | तांत्रिक निविदा छाननी दिनांक | दि.०५.०१.२०२३ (दुपारी ३.०० वाजता ) |
| ८ | वाणिज्यिक निविदा उघडणे | दि.०७.०१.२०२३ (दुपारी ३.०० वाजता ) |
| ९ | कोऱ्या निविदा मिळण्याचे कार्यालय | रोखपाल, शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) **अथवा** संस्थेचे संकेत स्थळ www.gcoeara.ac.in |
| १० | भरलेल्या निविदा सादर करावयाचे कार्यालय | आवक-जावक विभाग शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) |

इच्छुक निविदाकारणी निविदा दोन प्रपत्रांमध्ये (प्रपत्र - अ व प्रपत्र - ब) भरून लिफाफा क्रमांक १ (प्रपत्र - अ, बयाना रक्कम रु.२०००/- चा मूळ धनाकर्ष व कागदपत्रे) व लिफाफा क्रमांक २ (प्रपत्र - ब व दरपत्रक) सीलबंद करून लिफाफ्यावर लिफाफा क्रमांक १ (प्रपत्र - अ व कागदपत्रे) व लिफाफा क्रमांक २ (प्रपत्र - ब व दरपत्रक) असे नमूद करून सीलबंद लिफाफ्यात टाकावेत व लिफाफ्यावर "शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) या संस्थेसाठीच्या उपहारगृहासाठी सेवा पुरवण्याबाबत निविदा" असे नमूद करून लिफाफा संस्थेच्या कार्यालयात विहित कालावधीत सादर करावा. विहित कालावधीत प्राप्त न होणाऱ्या निविदेचा विचार केला जाणार नाही, तसेच टपालाद्वारे विहित कालावधीनंतर प्राप्त निविदेंचाही विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

सर्वप्रथम तांत्रिक कागदपत्रांच्या पडताळणीसाठी लिफाफा क्रमांक १ (प्रपत्र - अ, बयाना रक्कम रु.२०००/- चा मूळ धनाकर्ष व कागदपत्रे) उघडण्यात येऊन निविदेत नमूद केल्याप्रमाणे बयाना रकमेचा रु.२०००/- चा मूळ आणि धनाकर्ष आवश्यक कागदपत्रे सादर केली आहेत किंवा कसे त्याबाबत खात्री करण्यात येईल. मूळ धनाकर्ष किवा/व आवश्यक कागदपत्र सादर न केल्याचे आढळून आल्यास अशी निविदा अपात्र ठरविण्यात येतील. जे निविदाकार उपरोक्त प्रक्रियेदरम्यान निविदा पूर्व बैठकिस उपस्थित राहू इच्छितात त्यांनी वर नमूद केलेल्या ठिकाणी वेळेवर उपस्थित रहावे. लिफाफा क्रमांक २ (प्रपत्र - ब व दरपत्रक ) उघडण्यापूर्वी तांत्रिक लिफाफा क्रमांक १ (प्रपत्र - अ, बयाना रक्कम रु.२०००/- चा मूळ धनाकर्ष व कागदपत्रे) च्या पडताळणी मध्ये पात्र ठरलेल्या निविदा धारकांची, दरपत्रिकेची नियुक्त समितीमार्फत अहर्ता छाननी करण्यात येईल. दोन किवा अधिक निविदा करांचे दर समान असल्यास प्रत्येकाला स्वतंत्रपणे चर्चेसाठी बोलाविले जाईल व त्या आधारे अंतिम निर्णय घेतला जाईल. चर्चेद्वारे सुधारित दर निश्चित करण्याचे अधिकार उपहारगृह समितीस राहतील.

संबंधित सर्व कागदपत्रे ज्या नावे निविदा सादर केली आहे त्याच नावाने असणे बंधनकारक आहे. तसेच तांत्रिक लिफाफे उघडल्यावर नियुक्त समितीने मागणी केल्यास सर्व मूळ कागदपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करणे अनिवार्य आहे. निविदा भरण्यापूर्वी निविदा धारकाने उपहारगृहाची पाहणी करावी. निविदा धारकास निविदा भरताना काही अडचण असल्यास काही बाबतीत स्पष्टीकरण आवश्यक असल्यास निविदा पूर्व बैठकीस ( दिनांक ०२.०१.२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता) उपस्थित राहून त्यांच्या शंकांचे /अडचणींचे निरसन करून घ्यावे.

कोणत्याही क्षणी निविदा प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार मा. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) यांना राहतील.

17-12-22

(डॉ. दिलीप. रा. पानगव्हाणे)
प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय अवसरी (खुर्द)

N.S-Nehe

## प्रपत्र "अ"

## शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी(खुर्द) या संस्थेतील उपहारगृहसाठी सेवा पुराविण्याबाबत तांत्रिक कागदपत्रे

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जदाराचे/ संस्थेचे पूर्ण नाव : | |
| २ | अर्जदाराचे/ संस्थेचे पूर्ण पत्ता : | |
| ३ | मोबाईल नंबर : | |
| ४ | ई-मेल : | |
| **[निविदाकाराने वरील माहिती (क्र.१ ते ४) त्यांच्या संस्थेच्या लेटरहेड वर सही व शिक्का सह द्यावी.]** | | |

| | |
|---|---|
| ५ | **आवश्यक पात्रता संबंधी कागदपत्रे : (कागद पत्रांची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक )** |
| A | दि. ०१/०६/२०१७ पासून पुढील कालावधीत, किमान ०२ वर्षे कालावधीसाठी व किमान १५० व्यक्तींसाठी उपहारगृह / खानावळ समाधानकारकरित्या चालवली असल्याचे सबंधित आस्थापनेने दिलेले अनुभव प्रमाणपत्राची प्रत |
| B | महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम १९४८ अंतर्गत नोंदणीच्या दाखल्याची प्रत व अद्यावत नूतनीकरणाच्या दाखल्याची प्रत (नोंदविलेल्या धंद्याचे स्वरूप - केटरिंग सर्विसेस अथवा फूड बिझनेस अथवा फूड वेंडर अथवा खानावळ अथवा तत्सम असे असावे). |
| C | अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र शासनाच्या अन्न सुरक्षा मानके अधिनियम २००६ अंतर्गत परवाना (नोंदीच्या दाखल्याची प्रत) |
| D | PAN /TAN /TIN No. नोंदणी प्रमाणपत्र / कार्ड ची प्रत |
| E | जी.एस.टी. रजिस्ट्रेशन प्रमाणपत्राची प्रत व आर्थिक वर्ष २०२१-२२ मधील किमान सहा महिन्याचे जीएसटी रिटर्न्स सादर केल्याच्या पुराव्याची प्रत (Form GSTR-1 व GSTR-3B) |
| F | आर्थिक वर्ष २०२०-२१ व २०२१-२२ चे आयकर विवरण पत्र (रिटर्न्स) सादर केल्याच्या ACKNOWLEDGEMENT ची प्रत |
| G | भागीदार करारनामा (Partnership Deed) ची प्रत **अथवा** भागीदार करारनामा नसल्यास निविदाकाराच्या लेटरहेडवर भागीदारी नसल्याचे स्वयंघोषित प्रमाणपत्राची प्रत.<br>(वरील दोन कागदपत्रांपैकी एक कागदपत्र जोडणे आवश्यक आहे.) |
| H | आधार कार्ड (लागू असल्यास ) प्रत |

| | |
|---|---|
| ६ | निविदेतील अटी व शर्ती मान्य असल्याचे स्वयंघोषणा पत्र. (परिशिष्ठ १ प्रमाणे) |
| ७ | निविदाकाराविरुद्ध पोलीस तक्रार नसल्याबाबत चे तसेच निविदाकारावर कोणत्या शासकीय/निमशासकीय आस्थापनेने दंडात्मक कार्यवाही (काळ्या यादीत नाव टाकणे, निष्कासन इत्यादी) केली नसल्याबद्दलचे निविदाकाराचे स्टॅम्प पेपरवरील प्रतिज्ञापत्र (affidevit) स्वसाक्षांकित करून जोडावे. (परिशिष्ठ २ प्रमाणे) |
| ८ | कोऱ्या निविदेची किंमत र. १००/- इतकी रक्कम ऑनलाईन पद्धतीने संस्थेस भरल्याच्या पावतीचा क्रमांक, दिनांक व प्रत. |
| ९ | बिनव्याजी बयाना रक्कम र. २०००/- चा प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) च्या धनाकर्षाचा क्रमांक, दिनांक व मूळ प्रत. |

ठिकाण : **निविदाकाराची सही व शिक्का**

दिनांक: (निविदाकाराचे नाव: ------------------------------------------)

## <u>प्रपत्र "ब"</u>

## शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी(खुर्द) या संस्थेतील उपहारगृहसाठी सेवा पुराविण्याबाबत खाद्यपदार्थांचे नाव व दराचे विवरणपत्र

१. अर्जदाराचे/ संस्थेचे पूर्ण नाव : ____________________

२. अर्जदार / संस्थेचा पूर्ण पत्ता : ____________________

____________________

### खाद्यपदार्थांचे नाव व दराचे विवरणपत्र

| अ.क्र. | खाद्यपदार्थांचे नाव (परिमाण) | दर (सर्व करांसहित) नमूद करावा |
|---|---|---|
| १ | चहा (६० मि.लि.) १ कप | |
| २ | कॉफी (६० मि.लि.) १ कप | |
| ३ | दुध (६० मि.लि.) १ कप | |
| ४ | ग्रीन टी/ लेमन टी | |
| ५ | कोल्ड कॉफी | |
| ६ | लस्सी (२५० मि.लि.) | |
| ७ | समोसा (५० ग्रॅम) १ नग ग्रॅम | |
| ८ | वडापाव (१ वडा, १ पाव) | |
| ९ | कांदा/ बटाटा/ मिरची भजी - (५० ग्रॅम ) | |
| १० | कांदा पोहे - ०१ प्लेट (एकूण २०० ग्रॅम ) | |
| ११ | उपमा - -१ प्लेट (प्रत्येकी १०० ग्रॅम ) | |
| १२ | शिरा - १ प्लेट (प्रत्येकी १०० ग्रॅम ) | |
| १३ | पॅटीस (७५ ग्रॅम) | |
| १४ | मिसळ पाव (२ पाव) | |
| १५ | इडली सांबर - ०२ नग (एकूण १५० ग्रॅम ) | |
| १६ | उडीद वडा सांबर- ०२ नग (एकूण १५० ग्रॅम ) | |
| १७ | बटाटा वडा सांबर - ०२ नग (एकूण १५० ग्रॅम ) | |
| १८ | आलू पराठा | |
| १९ | राईस प्लेट (४ चपाती, २ भाज्या, डाळ व भात ) | |
| २० | पुरी भाजी (४ पुरी) | |
| २१ | दालराईस (१ प्लेट) | |
| २२ | व्हेज पुलाव (१ प्लेट ) | |

| | | |
|---|---|---|
| २३ | साबुदाणा खिचडी (१ प्लेट) | |
| २४ | साबुदाणा वडा - २ नग (एकूण १५० ग्रॅम) | |
| २५ | पावभाजी (२ पाव) | |
| २६ | मसाला पाव | |
| २७ | दही वडा (२ वडे) | |
| २८ | पाणी बाटली (१ ली) | |
| २९ | व्हेज सँडविच - ०२नग | |
| ३० | कटलेट - १ प्लेट (७५ ग्रॅम ) | |
| ३१ | साधा डोसा | |
| ३२ | पेपर डोसा | |
| ३३ | उतप्पा | |
| ३४ | टोमॅटो ऑमलेट | |
| ३५ | मॅगी(७०ग्रॅम ) | |
| ३६ | क्रीमरोल - १ नग | |
| | **एकूण किंमत** | |
| **एकूण किंमत (अक्षरी रुपय ) :** | | |

**(टीप : नारळाची चटणी , सांबर, टोमॅटो सॉस हे वरील डिश चा भाग म्हणून देता येईल.)**

ठिकाण :

**निविदाकाराची सही व शिक्का**

दिनांक:

(निविदाकाराचे नाव: ------------------------------------------)

## शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द)

## महाविद्यालयातील उपहारगृह कंत्राटी पद्धतीने सेवा पुरविण्याबाबत नियम, अटी व शर्ती

### १. कायदेशीर अटी

१.१ उपहारगृहात पुरविण्यात येणाऱ्या खाद्यपदार्थांची गुणवत्ता नियमितपणे तपासणी समितीमार्फत तपासण्यात येईल.

१.२ उपहारगृह चालाविण्यासाठीची सेवा पुरवठा आदेश मिळाल्यानंतर दहा दिवसात उपहारगृह सुरु करणे बंधनकारक राहील.

१.३ उपहारगृहातील सेवा विद्यार्थी, अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी ऐच्छिक असेल. तेच उपहारगृहातील सेवा मागणीनुसार अभ्यागतांना उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील.

१.४ महाविद्यालयात उपहारगृह स्वतः न चालविता ते चालविण्यासाठी अन्य व्यक्तीची नेमणूक (Sub-Contracting)करता येणार नाही, तसे आढळून आल्यास कंत्राट रद्द करण्यात येईल.

१.५ कंत्राटदारास करारातील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे करार पत्र रूपये ५००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटरी समोर करावे लागेल. उपहारगृह कामकाजाबाबत कोणतीही तक्रार असल्यास त्याची शहानिशा करून तक्रारीत तथ्य आढळ्यास करार तात्काळ संपुष्टात आणण्याचे अधिकार मा. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) यांना राहतील.

१.६ उपहारगृह चालवण्यासाठी एकूण रुपये १,००,००० /- (रु. एक लाख फक्त) अनामत रक्कम संस्थेत जमा केल्यानंतरच करार अस्तित्वात येईल.

१.७ संस्थेतर्फे स्वयंपाक घर, भोजन कक्ष, पाणी व विद्युत पुरवठा ए. सुविधा पुरविण्यात येईल, परंतु उपहारगृह चालकाने प्रतिमाह विज बिल स्वतः भरने बंधनकारक राहील. क्वचित प्रसंगी पाणी, वीजपुरवठा अपरिहार्य कारणामुळे संस्थेमार्फत पुरवण्यात अडचण निर्माण झाल्यास त्याबाबतची पर्यायी व्यवस्था स्वखर्चाने करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची असेल .

१.८ उपहारगृह चालकास प्रथम वर्षात प्रतीमाह रु. ७,०००/- संस्थेस भरावे लागेल. त्यानंतर पुढील प्रत्येक वर्षात १०% वाढीव भाडे भरावे लागेल.

१.९ कराराची मुदत निविदा मान्य झाल्यापासून तीन वर्षासाठी असेल. करार कालावधीमध्ये उपहारगृ चालकाची सेवा व दर्जा मानांकनाप्रमाणे नसल्यास आणि दोनदा सूचना देऊनही मानांकनाप्रमाणे दर्जा सुधारला नाही तर पुढील प्रत्येक प्रकरणी उपहारगृह चालकास र. २,०००/- इतका दंड आकारण्यात येईल आणि वारंवार सूचना देऊनही मानांकनाप्रमाणे दर्जा सुधारला नाही तर सेवा खंडित करण्याचे अधिकार किवा संपूर्ण वर्षातील कामकाजाचे मूल्यमापन करून पुढील वर्षासाठी मुदतवाढ देण्याचे अधिकार मा. प्राचार्य,शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) यांना राहतील. सदरील सेवा खंडित करण्यासाठी ३० दिवसाची आगाऊ सूचना उपहारगृह चालकास देण्यात येईल, तसेच उपहारगृह चालकाला मुदतपूर्व सेवा खंडित करावयाची असल्यास ९० दिवसांची आगाऊ सूचना संस्थेस देणे बंधनकारक राहील किंवा पुढच्या कंत्राटदाराची नियुक्ती होईपर्यंन्तचा कालावधी दरम्यान (यापैकी जे आधी घडेल ते) उपहारगृह चालवणे बंधनकारक

असेल. तसे न केल्यास कंत्राट दराची संस्थेकडे जमा असलेली अनामत रक्कम परत मिळणार नाही व ती शासनास जमा करण्यात येईल याची नोंद घ्यवी. कराराची मुदत संपल्या नंतर उपहारगृहातील सर्व शासकीय साहित्य संस्थेकडे जमा करणे आवश्यक राहील. त्यानंतरच कंत्राटदाराची अनामत रक्कम परत केली जाईल.

१.१० उपहारगृहातील सर्व विद्युत साहित्याची (उदा. बल्ब, ट्यूब, वायरींग, फॅनसह) किरकोळ देखभाल ही कंत्राटदाराची जबाबदारी राहील.

१.११ उपहारगृहातील उपकरणे, फर्निचर, इत्यादी सर्व वस्तूंची व्यवस्था व देखभाल ही कंत्राटदाराची जबाबदारी असेल.

१.१२ उपहारगृहाचा उपयोग निवासस्थान म्हणून करता येणार नाही.

१.१३ संस्थेच्या परिसरात बैठका व इतर कार्यक्रमच्या वेळी मागणीनुसार उपहारगृहाच्या सेवा पुरवणे बंधनकारक राहील.

१.१४ उपहारगृहसाठी फ्रीज/ फ्रीजर ची सुविधा कंत्राटदारांनी स्वतः करावयाची आहे.

१.१५ उपहारगृहचालकांनी सर्व कामगार कायद्यांचे पालन करणे बंधनकारक आहे व त्यासंदर्भात कोणतीही तक्रार प्राप्त झाल्यास व तक्रारीत तथ्य आढळल्यास संबंधीतावर दंड लावणे / करार संपुष्टात आणणे यासारखी कारवाई करण्यात येईल. तसेच उपहारगृहात बालकामगार कायद्यानुसार बालकामगार ठेवता येणार नाहीत.

१.१६ उपहारगृहातील काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची संपूर्ण माहिती संस्थेमध्ये सादर करावी लागेल. तसेच उपहारगृहातील काम करणाऱ्या कर्मचाऱ्या विरुद्ध कोणताही गुन्हा पोलीस स्टेशन मध्ये दाखल नाही याची हमी /खात्री द्यावी लागेल. नवीन कर्मचारी नियुक्तीच्या आधी त्याबाबतची परवानगी संस्थेकडून घ्यावी लागेल.

१.१७ करार कालावधीत कोणत्याही कारणास्तव उपहारगृह चालकाची सेवा खंडित करण्यात आली व नवीन उपहारगृह चालकाची नियुक्ती करून काम करून घ्यावे लागले तर अशा वाढीव खर्चाची वसुली जुन्या उपहारगृह चालकाच्या सुरक्षा रकमेतून करण्यात येईल.

१.१८ उपहारगृहातील आणि भोजन कक्षातील बॉश बेसीन, पंखे, दिवे, टाईल्स, फारश्या, खुर्च्या व टेबल स्वच्छ ठेवणे बंधनकारक राहील.

१.१९ उपहारगृह सेवा पुरविण्याचा करार पुणे जिल्ह्याच्या न्यायाधिकार कक्षेत राहील.

१.२० उपहारगृह चालकाने स्वतःच्या खर्चाने स्वयंपाकगृहाचा पूर्ण भाग, स्वयंपाक गृहाच ओटा, भांडी धुण्याची जागा, धान्याचे भांडारगृह, गॅस स्टोरेज, स्वयंपाक गृहाच्या टाईल्स तसेच ओटा/ प्लॅटफॉर्म नियमितपणे स्वच्छ ठेवणे बंधनकारक राहील. कोणत्याही प्रकारची दुर्गंधी, घाणेरडे डाग भिंतीवर अथवा फरशीवर असता कामा नये. स्वछतेसाठी Standard Cleaning Material चा वापर करावा. दोनदा सूचना देऊनही अस्वच्छता दिसून आल्यास रु. १,०००/- इतका दंड आकारण्यात येईल.

१.२१ उरलेले शिळे अन्न / खरकटे, ब्लॅक प्लास्टिक डिस्पोजेबल बॅगमध्ये बंद करून त्याची विल्हेवाट शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय अवसरी (खुर्द) यांच्या इमारतीच्या आवाराबाहेर करण्याची जबाबदारी संपूर्णपणे उपहारगृह चालकाची राहील. शासकीय अभियांत्रिकी व संशोधन

महाविद्यालय अवसरी (खुर्द) यांच्या इमारतीच्या आवाराबाहेर कचऱ्याची विल्हेवाट लावताना ग्रामपंचायत/नगरपालिका/ महानगरपालिका यांचेकडून कोणत्याही स्वरुपाची तक्रार आल्यास त्याचे निराकरण करण्याची जबाबदारी सर्वस्वी उपहारगृह चालकाची राहील. कचऱ्याची योग्य प्रकारे विल्हेवाट न लावल्यास रु. १,०००/- दंड आकारण्यात येईल.

१.२२ उपहारगृह चालकाने सेवा पुरविताना अन्नाची गुणवत्ता, स्वच्छता आणि सर्व सेवांमध्ये कोणत्याही वेळी कोणत्याही प्रकारची कमतरता न करता सातत्याने उच्च दर्ज्याची सेवा पुरविणे आवश्यक राहील.

१.२३ उपहारगृहासाठी वापरण्यात येणाऱ्या गॅस सिलेंडरची व्यवस्था व खर्च स्वतः उपहारगृह चालकास करावा लागेल. तसेच गॅस सिलेंडर/ पाईपलाईन याबाबत काही दुर्घटना घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी उपहारगृह चालकाची राहील व संस्था कोणत्याही प्रकारे सदरील बाबत जबाबदार असणार नाही याची उपहारगृह चालकाने नोंद घ्यावी, तसेच याबाबत होणारा खर्च उपहारगृह चालकास करणे बंधनकारक राहील.

१.२४ उपहारगृह चालू केल्या पासून दोन महिन्यांच्या आत संबंधीत कंत्राटदारांनी उपहारगृहाच्या जागेची आरोग्य विषयक तपासणी ग्रामीण आरोग्य विभागाकडून करून घेवून त्या विभागाचा आरोग्य विषयक ना-हरकत दाखला सादर करणे बंधनकारक राहील.

१.२५ उपहारगृहाच्या जागेचा वापर दुसऱ्या कोणत्याही व्यवसायासाठी करता येणार नाही. तसे आढळून आल्यास करार तत्काळ रद्द केला जाईल.

१.२६ कंत्राटदाराने उपहारगृह कामगारांना किमान आवश्यक त्या औषधासह प्रथमोपचार पेटीची सुविधा प्रदान करणे अनिवार्य आहे.

१.२७ कंत्राटदाराने उपहारगृहात तक्रार व सूचना नोंदवही ठेवली पाहिजे आणि प्राप्त झालेल्या तक्रारी व सूचना याबाबत संस्थेशी सल्लामसलत करून कार्यवाही करणे बंधन कारक असेल.

१.२८ उपहारगृह कंत्राटाच्या संपूर्ण कालावधी दरम्यान कंत्राटदारास कोणत्याही कारणास्तव खाद्यपदार्थ/पेय यांचे दर वाढविता येणार नाहीत.

१.२९ सीलबंद अन्न पदार्थ (packed food), सीलबंद पाणी बाटली, शीतपेय इ. हे उच्च दर्जाचे असावेत तसेच ते मुदतबाहय झालेले नसावेत आणि त्याचे दर हे छापील किमतीपेक्षा जास्त नसावेत.

१.३० उपहारगृहामध्ये मद्यपान/ धुम्रपान/ अमली पदार्थांचे सेवन व त्याची विक्री करण्यास सक्त मनाई आहे.

१.३१ उपहारगृह कंत्राटदारास केंद्र शासन व महाराष्ट्र शासन यांच्या नियमानुसार आवश्यक कर भरणा वेळेत करावा लागेल व तो भरला असल्याची पोहच पावती/ पुरावा संस्थेने मागणी केल्यास तत्काळ उपलब्ध करून द्यावा लागेल.

## २. उपहारगृह संबंधित अटी

२.१ महाविद्यालयातील ग्राहकांकडून (विद्यार्थी/ शिक्षक/ कर्मचारी/ पालक इ.) खाद्यपदार्थ/ पेय इ. दराच्या वसुलीची पूर्ण जबाबदारी संबधित कंत्राटदाराचीच राहील.

२.२ सर्वसाधारपणे उपहारगृहाची वेळ सकाळी ६.३० ते सायंकाळी ७.३० अशी राहील. उपहारगृहाची वेळ मा. प्राचार्य व विद्यार्थ्यांच्या एकत्रित चर्चेनुसार बदलता येईल.

२.३ उपहारगृह चालकयांनी अन्नधान्य, किराणा सामानाचा साठा व इतर सर्व कच्च्या मालांची सुरक्षित व स्वच्छ पद्धतीने साठवण करण्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची असेल.

२.४ उपहारगृहात **<u>वनस्पती तूप आणि मोनोसोडियम ग्लूटामेट (अजिनोमोटो)</u>** चा वापर पूर्णपणे प्रतिबंधित राहील.

२.५ तयार केलेले अन्न ४ तासांनंतर वापरू नये. तसे निदर्शनास आल्यास ठरवल्याप्रमाणे दंड आकारण्यात येईल.

## ३. उपहारगृह किचनमध्ये व परिसराची स्वच्छता संबधित मुद्दे

३.१ उपहारगृहामध्ये उपलब्ध असणा-या सर्व अन्न पदार्थांचा दर्जा उत्कृष्ट असावा. सर्व खाद्य पदार्थ ताजे, गरम व स्वच्छ असावेत.

३.२ खाद्यपदार्थांचा दर्जा चांगला ठेवण्यासाठी उपहारगृहात वापरावयाच्या उपभोग्य वस्तू व पदार्थांबाबत सविस्तर तपशील खालील तक्त्याप्रमाणे असेल. सदर उपभोग्य वस्तू नमूद केलेल्या ब्रँड व्यतिरिक्त इतर ब्रँडच्या वापरल्याचे आढळल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल. तसेच सर्व भाज्या ताज्या, स्वच्छ व किटकमुक्त असणे आवश्यक राहील. सर्व भाज्यांचा साठा स्वच्छ व सुरक्षित पद्धतीने करणे बंधनकारक असेल.

३.३ कंत्राटदाराने ओला व सुका कचरा इ. ची विल्हेवाट संस्थेच्या परिसराबाहेर स्वतः करणे आवश्यक राहील. कचऱ्याच्या दुर्गंधीपासून आरोग्यास धोका निर्माण होणार नाही याची सर्व जबाबदारी कंत्राटदाराची राहील. तसेच अन्न आणि कचऱ्यामुळे ड्रेनेज लाईन चोकअप होणार नाही याची काळजी घ्यावी व चोकअप झाल्यास त्याची दुरुस्ती कंत्राटदाराने स्वखर्चाने करावयाची आहे. उपहारगृह परिसर स्वच्छतेची जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

३.४ उपहारगृहातील कर्मचारी यांच्या शारीरिक आरोग्य व स्वच्छतेचे कटाक्षाने पालन होणे अनिवार्य आहे. उपहारगृहातील कर्मचाऱ्यानी एप्रन, ग्लोव्हज, टोपी इत्यादी आवश्यक गणवेश वापरणे बंधनकारक असेल. तसेच कामगारांची दर तीन महिन्यांनी वैद्यकीय तपासणी झालेली असल्याचा पुरावा संस्थेच्या कार्यालयात सादर करावा लागेल. उपहारगृहात काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांचे शासन नियमानुसार करोना प्रतिबंधक लसींचे आवश्यक डोस घेतलेले असणे आवश्यक आहे व कोविड -१९ व इतर तत्सम आजारांबाबत शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या किंवा केल्या जाणाऱ्या नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे.

३.५ उपहारगृहातील अन्नाचा दर्जा आरोग्यास हितकारक असावा. उपहारगृहातील अन्नापासून विद्यार्थ्यांना अथवा इतरांना कोणत्याही प्रकारची विषबाधा झाल्यास त्याची सर्व जबाबदारी उपहारगृह चालकावर राहील.

३.६ स्वयंपाकघर स्वच्छता सुनिच्छित करण्यासाठी सर्व शक्य उपाय करणे आवश्यक आहे. यामध्ये बेसिन वर हात धुण्यासाठी पुरेसा द्रव साबण, हात स्वच्छ करण्यासाठी स्वच्छ टॉवेल, खाद्यपदार्थ इत्यादी हाताळण्यासाठी कामगारांनी handgloves इत्यांदींचा पुरवठा करणे

आवश्यक आहे.

३.७ वॉश बेसिनवर हात धुणेसाठी द्रव साबण राखणे ही कंत्राटदाराची जबाबदारी आहे.

३.८ उपहारगृह कामगारांच्या स्वच्छतागृह/ शौचालयात, साबण, टॉवेल इत्यादी तरतुदींसह स्वच्छतेची सर्वोच्च पातळी राखली पाहिजे.

३.९ कंत्राटदाराने नेहमीच डाइनिंग एरियाची स्वच्छता राखली पाहिजे. तसेच उपहारगृहातील दुर्गंधी टाळण्यासाठी कंत्राटदाराने उपहारगृहाच्या डाइनिंग, किचन आणि वॉशिंग एरियामध्ये नियमितपणे स्वच्छते बरोबर सॅनीटायझेशन करणे अनिवार्य आहे.

३.१० किचनक्षेत्र, जेवणाचे क्षेत्र आणि साठवणूक क्षेत्र येथे कमीत कमी दोन महिन्यांतून एकदा परवानाधारक एजन्सीमार्फत कीटक नियंत्रण करणे संबधित कंत्राटदाराची जबाबदारी असेल. तसे न केल्यास संस्थेमार्फत कीटक नियंत्रण करण्यात येईल व त्याचा खर्च कंत्राटदाराकडून वसूल करण्यात येईल.

३.११ सदर उपहारगृह कंत्राटाची प्रक्रिया ही वरिष्ठ कार्यालयाच्या मान्यतेस अधीन राहून करण्यात येत आहे.

## उपभोग्य वस्तूंच्या व पदार्थांच्या ब्रँड बाबत तक्ता

| अनुक्रमांक | उपभोग्य वस्तू व पदार्थ | ब्रँड |
|---|---|---|
| १ | आयोडीनयुक्तमीठ | टाटा, अन्नपूर्णा, निसर्ग ताजा, आशिर्वाद, निरमा , सफोला, कॅप्टन कूक |
| २ | मसाले | एमडीएच, नॉर, कॅच, एव्हरेस्ट, मदर, निलॉन्स,एमटीआर, प्रिया, पतंजली,रामदेव,केप्र,प्रवीण,सुहाना. |
| ३ | तेल(सूर्यफूल) refined | सन ड्रॉप, गोदरेज, सफोला, फॉर्च्यून, जेमिनी, निसर्ग फ्रेश, धारा,(हायड्रोजनेटेड (वनस्पती) तेलाचा वापर प्रतिबंधित आहे.) |
| ४ | लोणचे | मदर, प्रिया, टॉप, नीलॉन, एमटीआर, बेडेकर,प्रवीण |
| ५ | आटा | आशिर्वाद, पिल्सबरी, अन्नपूर्णा, सम्राट, निसर्ग ताजा, पतंजली, शक्तीभोग |
| ६ | पापड | लिज्जत, गणेश, श्रीजी, रामदेव, मदर |
| ७ | तूप | अमुल, मदर डेअरी, ब्रिटानिया, गिट्स, नेस्ले, एव्हरीडे, डायनॅमिक्स, वाडीलाल, वारणा, कात्रज,गोवर्धन |
| ८ | बटर | अमूल, ब्रिटानिया, मदार डेअरी , हटसन |
| ९ | जाम | किसान , नाफेड, नेस्ले |
| १० | श्रीखंड | अमूल, वारणा,चितळे,कात्रज,गोवर्धन |
| ११ | पनीर | अमूल, मदरडेअरी, वारणा, गोवर्धन |
| १२ | कोलमतांदूळ | रॉयल, डोनूर, कोहिनूर, इंडियागेट |
| १३ | तुरडाळ / मसूरडाळ / | टाटा, इंडियागेट, एमटीआर, मेट्रो(डीमार्ट / बिगबाजार / बिग |

| | | |
|---|---|---|
| | उडीदडाळ / चणाडाळ | बास्केट वरील पॅक केलेले साहित्य) |
| १४ | केचप | मॅगी, किसान |
| १५ | बेसन | राजधानी, शक्तीभोग, सम्राट किवा एगमर्क ब्रँड |
| १६ | तांदूळ | बासमती, कोलम, चीनुर, आंबेमोहर, इंडिया गेट किवा एगमर्क ब्रँड |
| १७ | चहा | रेडलेबल /ताजमहाल/परिवार /टाटा/सोसायटी |
| १८ | कॉफी | ब्रु/ नेसकॉफी/ ब्रूकबॉड/ ग्रीनलेबल /टाटा |
| १९ | दुध | चितळे/ कात्रज /गोकुळ/ अमूल/वारणा/गोवर्धन/अक्षरा/मदार डेअरी/ कात्रज / राजहंस |
| **** सर्व नॉन ब्रँडेड पदार्थ उपहारगृह कमिटीने ठरविल्याप्रमाणे राहतील. | | |

## ४. नियमांचे उल्लंघना बाबत दंड

नियमांचे उल्लंघन केल्यावर कंत्राटदारांना खालील प्रमाणे दंड आकारला जाईल.

| अनुक्रमांक | नियम उल्लंघन | प्रति तक्रार किमान दंड (रु.) |
|---|---|---|
| १ | काउंटरवर तक्रार नोंदवहीची उपलब्धता नसल्यास | १०००/- |
| २ | a) जेवणामध्ये/ पदार्थामध्ये केस, रस्सी, प्लास्टिक, कापड, खडा किवा खडयासारख्या वस्तू आढळल्यास<br>b) अस्वच्छ भांड्याबाबत आठवड्यामध्ये तीन किंवा अधिक तक्रारी आल्यास<br>c) कामगारांकडून गैरवर्तन/त्यांच्या पोशाख आणि वैयक्तिक स्वच्छते बाबत तक्रार आल्यास.<br>d) कामगारांची तिमाही आरोग्य तपासणी न केल्यास | ५०००/- |
| ३ | काचेचे तुकडे, नखे, हार्डप्लॅस्टर सारख्या तीक्ष्णवस्तू, खाद्य पदार्थांमध्ये आढल्यास | १००००/- |
| ४ | शिजवलेल्या अन्नात किडे (अळी) आढळल्यास | १५०००/- |
| ५ | विषबाधा झाल्यास | किमान रू.2 लाख किंवा त्याहून अधिक, शिवाय करार संपुष्टात येईल. दंड व/किवा पोलीस कार्यवाहीस पात्र राहील |

17-12-22

**(डॉ. दिलीप. रा. पानगव्हाणे)**

प्राचार्य

N.S. Nehe

शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय अवसरी (खुर्द)

## ५. निविदाकाराच्या पात्रतेचे निकष

५.१ निविदाकाराचे नोंदविलेल्या धंद्याचे स्वरूप - केटरिंग सर्विसेस अथवा फूड बिझनेस अथवा फूड वेंडर अथवा खानावळ अथवा तत्सम असे असावे व ते महाराष्ट्र दुकाने व आस्थापना नियम १९४८ अंतर्गत नोंदणी केलेले असावे. सदर नोंदणी प्रमाणपत्र निविदा भरण्याच्या शेवटच्या दिनांकानंतर कमीत कमी एक महिन्यापर्यंत वैध असावे.

५.२ अन्न व औषध प्रशासन यांचेकडे केलेल्या नोंदीच्या दाखल्याची प्रत असावी व ती निविदा भरण्याच्या शेवटच्या दिनांकानंतर कमीत कमी एक महिन्यापर्यंत वैध असावे.

५.३ निविदाकारास दि. ०१-०६-२०१७ नंतरच्या कालावधीत किमान ०२ वर्षे कालावधीसाठी व किमान १५० व्यक्तींसाठी उपहारगृह / खानावळ समाधानकारकरित्या चालवली असल्याचा अनुभव असणे आवश्यक आहे.

५.४ नोंदणीकृत आस्थापनेस अनुसरून आवश्यक वैयक्तिक मालकाचे अथवा संस्थेचे PAN Card असावे.

५.५ सेवा पुरवठादाराकडे जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे, तसेच आर्थिक वर्ष २०२१-२२ किवा २०२२-२३ मधील किमान सहा महिन्याचे जीएसटी भरणा केल्याचे GSTR-1 व GSTR-3B उपलब्ध असणे आवश्यक आहे.

५.६ आर्थिक वर्ष २०२०-२१ व २०२१-२२ चे आयकर विवरण पत्र (रिटर्न्स) सादर केल्याच्या ACKNOWLEDGEMENT ची प्रत

५.७ भागीदार करारनामा (Partnership Deed) ची प्रत अथवा भागीदार करारनामा नसल्यास निविदाकाराच्या लेटरहेडवर भागीदारी नसल्याचे स्वयंघोषित प्रमाणपत्राची प्रत. (वरील दोन कागदपत्रांपैकी एक कागदपत्र) जोडणे आवश्यक आहे.

५.८ निविदाकारावर कोणत्याही शासकीय/निमशासकीय आस्थापनेने दंडात्मक कार्यवाही (काळ्या यादीत नाव टाकणे, निष्कासन इत्यादी) केली नसल्याबद्दलचे तसेच निविदाकारा विरुद्ध पोलीस तक्रार नसल्याबाबात निविदाकाराचे स्टॅम्प पेपर वरील प्रतिज्ञापत्र (affidavit) स्वसाक्षांकित करून सादर करावे लागेल.

५.९ निविदाकाराने निविदा शुल्क रु. १००/- (ना परतावा) ऑनलाईन पद्धतीने अदा केलेले असणे आवश्यक आहे.

५.१० निविदाकाराने बयाना रक्कम रु. २०००/- चा मूळ धनाकर्ष लिफाफा क्रमांक -१ मध्ये दिलेला असणे आवश्यक आहे.

## ६. निविदा सादर करावयाची पद्धती

६.१ प्रत्येक निविदाकारास एकच निविदा भरता येईल.

६.२ निविदा प्रसिद्ध झाल्यानंतर निविदापूर्व बैठक ( Pre-bid meeting ) आयोजित करण्यात येईल. त्यास निविदाकाराने किंवा अधिकृत प्रतिनिधीने उपस्थित (इच्छुक निविदाकारांकरिता) राहून शंका निरसन करून घ्यावे.

६.३ **तांत्रिक निविदा** - तांत्रिक निविदा सादर करताना प्रपत्र- अ मध्ये दर्शविलेल्या प्रमाणे सर्व कागदपत्रांचा समावेश (स्व-साक्षांकित प्रत ) असावा.

**वरील सादर केलेली कागदपत्रे जर खोटी/बनवत आढळल्यास अशा कंत्राटदारास काळ्या यादीत टाकण्यात येईल व आवश्यक वाटल्यास त्यावर पोलीस कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी..**

६.४ **वाणिज्यिक निविदा**–सोबत जोडलेल्या प्रपत्र-ब नुसार वाणिज्यिक निविदेत सर्व खाद्यपदार्थांचे स्वतंत्र दर (सर्व प्रकारच्या करासहित) (Rate inclusive of all taxes ) प्रत्येक खाद्यपदार्थासमोर नमूद करून शेवटी सर्व दरांची एकूण बेरीज करून ती सुस्पष्टपणे रुपयात अंकी व अक्षरी मध्ये नमूद करणे आवश्यक राहील.

## ७. निविदा उघडण्याची कार्यपद्धती

७.१ सर्वप्रथम तांत्रिक कागदपत्रांच्या पडताळणीसाठी लिफाफा क्रमांक १ (प्रपत्र - अ, बयाना रक्कम रु.२०००/- चा मूळ धनाकर्ष व कागदपत्रे) उघडण्यात येऊन निविदेत नमूद केल्याप्रमाणे आवश्यक कागदपत्रे सादर केली आहेत किवा कसे त्याबाबत खात्री करण्यात येईल. तांत्रिक छाननी दरम्यान निविदाकाराने सादर केलेली सर्व प्रमाणपत्रे व वैधता तपासण्यात येईल.

७.२ बयाना रक्कम रु. २०००/- चा मूळ धनाकर्ष किवा/ व आवश्यक कागदपत्र सादर न केल्याचे आढळून आल्यास अशी निविदा अपात्र ठरविण्यात येतील.

७.३ लिफाफा क्रमांक २ (प्रपत्र - ब व दरपत्रक ) उघडण्यापूर्वी तांत्रिक लिफाफा क्रमांक १ (प्रपत्र - अ व कागदपत्रे) च्या पडताळणी मध्ये पात्र ठरलेल्या निविदाकारांच्या वाणिज्यिक निविदा उघडण्यात येतील. त्यांनी सादर केलेल्या दरपत्रिकेची नियुक्त समितीमार्फत अहर्ता छाननी करण्यात येईल.

७.४ वाणिज्यिक निविदेत प्रपत्र - ब मधील सर्व खाद्यपदार्थांचे दर नमूद करणे अनिवार्य आहे. खाद्यपदार्थाचे दर (सर्व प्रकारच्या करांसहित) (Rate inclusive of all taxes) त्या त्या खाद्यपदार्थासमोर नमूद करून शेवटी सर्व खाद्यपदार्थांच्या दरांची एकूण बेरीज करून ती सुस्पष्टपणे रुपयात अंकी व अक्षरी मध्ये नमूद केलेली नसल्यास निविदा फेटाळण्यात येईल.

७.५ दोन किंवा अधिक निविदा करांच्या एकूण दरामध्ये समानता असल्यास दर समान असल्यास ज्या निविदाकारास राज्य शासन/ केंद्र शासन अथवा यांची कोणतीही आस्थापना अथवा त्यांची अंगीकृत मंडळे यांना सेवा समाधानकारकरित्या पुरविण्याचा दि. ०१/०६/२०१७ नंतरच्या कालावधीचा जास्त अनुभव असेल त्यास प्राधान्य देण्यात येईल किंवा प्रत्येकाला स्वतंत्रपणे चर्चेसाठी बोलविले जाईल व त्या आधारे अंतिम निर्णय घेतला जाईल. चर्चेद्वारे सुधारित दर निश्चित करण्याचे अधिकार उपहारगृह समितीस राहतील.

## ८. कार्यादेश देण्याची कार्यपद्धती

८.१ वाणिज्यिक निविदेत सर्व खाद्य पदार्थांची एकूण किमत (सर्व प्रकारच्या करासहित) न्यूनतम (सर्व प्रकारच्या करासहित) प्रस्तावित केलेल्या पात्र कंत्राटदारास कार्यादेश देण्यात येईल.

८.२ ज्या निविदाकाराची निविदा स्वीकृत होईल त्यांनी नोटरीसमोर रु. ५००/- च्या स्टॅम्पपेपरवर करारातील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचा करारनामा सादर केल्यावर कंत्राट अस्तित्वात येईल.

८.३ वरील अनुक्रम ८.२ ची पूर्तता केल्यानंतर कार्यादेश देण्यात येईल. त्यानंतर ७ दिवसाच्या आत रु. १,००,०००/- (रुपये एक लाख) इतकी रक्कम सुरक्षा ठेव म्हणून बँक ग्यारंटी रुपात जमा करावी लागेल.

९.४ सेवा पुर्वठादाराने एक वर्षाचा करार संपण्यापूर्वी ९० दिवसांची पूर्वसूचना न देता सेवा बंद केल्यास सुरक्षा रक्कम जप्त करून शासनास जमा करण्यात येईल .

17-12-22

डॉ. दिलीप. रा. पानगव्हाणे

प्राचार्य

शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय अवसरी (खुर्द)

N.S.Nehe

## परिशिष्ठ-१

## स्वयंघोषणापत्र

**(निविदाकाराने स्वतःच्या / एजन्सी/ कंपनी च्या लेटर हेड वर सदर घोषणापत्र द्यावे)**

प्रमाणित करण्यात येते की, शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) यांनी संस्थेचे उपहारगृह सेवा पुरवठा सेवेविषयी घालून दिलेल्या अटी व शर्ती मी/ आम्ही वाचल्या असून मला/आम्हाला उपहारगृह सेवा पुरवठा करण्याची संधी मिळाल्यास निविदेतील व करारातील अटी व शर्तींची पूर्तता करण्याची जबाबदारी माझ्यावर / आमच्यावर असून त्या माझ्यावर / आमच्यावर बंधन कारक राहतील. वरील अटी व शर्तीचा जर माझ्या/आमच्याकडून भंग झाला तर माझी/आमची अनामत रक्कम जप्त करण्याचा अधिकार मा. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) यांना राहील. तसेच त्यामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई देखील करण्यास मी/ आम्ही जबाबदार राहीन/राहू. तसेच उपहारगृह सेवा पुरवठा कालावधीत सेवा अंतर्गत कामगारांकडून संस्थेच्या कोणत्याही मालमत्तेचे नुकसान झाल्यास, तसेच शासकीय नियमांचे/कायद्याचे पालन न झाल्यास त्याची भरपाई करण्याची जबाबदारी माझी/आमची राहील.

ठिकाण : निविदाकाराची सही व शिक्का

दिनांक : निविदाकाराचे नाव : -----------------------------------

पत्ता : ---------------------------------------------------

---------------------------------------------------

दूरध्वनी/ मोबाईल क्रमांक : ---------------------------

# परिशिष्ठ-२

## कंत्राटदाराने द्यावयाचे हमीपत्र

मी ______________________________ पदनाम
____________________ वय __________ राहणार ________________
संस्थेचे नाव ______________ ____________________________ पत्ता
:__________________________
____________________________________________________________

खालील प्रमाणे प्रतिज्ञा करतो की,

१. माझ्या एजन्सी/ कंपनीचे कोणत्याही व्यक्तीसोबत कोणत्याही प्रकारचे भागीदारी / शेअर किंवा प्रत्यक्ष/ अप्रत्यक्ष संबंध नाही.

२. माझी एजन्सी/ कंपनी दिवाळखोर म्हणून घोषित झालेली नाही.

३. माझ्या एजन्सी/ कंपनीने अनुचित कामगार प्रथेचा अवलंब केलेला नाही.

४. माझ्या एजन्सी/ कंपनीने कोणतेही गैरकृत्य करून किंवा नैतिक अधःपतनाचे कोणतेही कृत्य केलेले नाही.

५. माझ्या एजन्सी/ कंपनीने कोणतेही गुन्हेगारी कृत्य केलेले नाही. तसेच कंपनी विरुद्ध कोणत्याही न्यायालयात दावा दाखल झालेला नाही.

६. माझ्या एजन्सी/ कंपनीने आयकर/विक्रीकर व फेरा इ. कायद्यांचे उल्लंघन केलेले नाही. त्याबाबत माझ्या एजन्सी/ कंपनी विरुद्ध खटला किंवा दावा दाखल झालेला नाही.

७. माझ्या एजन्सी/ कंपनीला शासकीय/ निम-शासकीय / स्थानिक संस्था यांनी काळ्या यादीत टाकलेले नाही तसेच माझ्या एजन्सी/कंपनी विरुद्ध पोलीस तक्रार नाही.

८. माझ्या एजन्सी/कंपनीला ______________________________ संस्थेने ___ /___ /_____ ते ___ /___ /_____ या कालावधीसाठी

काळ्या यादीत टाकले होते. सदर कालावधी संपला असल्याने माझी कंपनी निविदा प्रक्रियेत सहभागी होण्यास पात्र आहे.

९. माझ्या एजन्सी/ कंपनीला सेवेच्या स्वरूप व व्याप्ती दिल्याप्रमाणे तसेच करारनाम्यातील अटी व शर्ती प्रमाणे सेवेचा दर्जा चांगला नसल्यास अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव मक्ता रद्द केल्यास माझी एजन्सी/ कंपनी सदर ठिकाणी पुरविलेल्या आवश्यक सेवेसाठी व इतर कामासाठी केलेल्या खर्चाची मागणी करणार नाही.

१०. पात्रतेबाबतचे दाखल केलेले सर्व कागदपत्र खरी आहेत. त्यात काही फसवेगिरी आढळून आल्यास किंवा तसे करार काळात आढळून आल्यास माझी एजन्सी/ कंपनी त्यासाठी जबाबदार राहु व अपात्र ठरू व माझी एजन्सी/ कंपनी अशा परिस्थितीत कोणतीही नोटीस न देता पुरविण्यात आलेली सेवा रद्द करण्याचा अधिकार मा. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) यांना राहील. तसेच मी निविदेसोबत जमा केलेली बयाना रक्कम व शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) यांचे कार्यालयाकडे जमा केलेली सुरक्षा रक्कम जप्त करण्याचा अधिकार मा. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) यांना राहील व ते मला मान्य राहील.

ठिकाण : निविदाकाराची सही व शिक्का

दिनांक : निविदाकाराचे नाव : --------------------------------------

पत्ता : ---------------------------------------------

---------------------------------------------------

दूरध्वनी/ मोबाईल क्रमांक :------------------------------

**State Bank Collect**

08-Dec-2022 [03:15 PM IST]

GOVT COLLEGE OF ENGG AND RESEARCH AVASARI

A/P AVASARI KHURD TAL AMBEGAON , A/P AVASARI KHURD TAL AMBEGAON , MANCHAR-412405

Provide details of payment

**Select Payment Category ***

Tender Form Fees

**Supplier Name ***

**PAN/TAN No. ***

**Mobile No. ***

**Tender Form Fees ***

**Remarks**

- Take two print outs of it, one copy attached to Tender Documents and one keep with you.
- If any Query contact to 02133-230582 or E-mail to office.gcoeavasari@dtemaharashtra.gov.in

Please enter your Name, Date of Birth **(For Personal Banking) / Incorporation (For Corporate Banking)** & Mobile Number.
This is required to reprint your e-receipt / remittance(PAP) form, if the need arises.

Name *

Date Of Birth / Incorporation *

Mobile Number *

Email Id

**Enter the text as shown in the image ***

**Select one of the Captcha options ***

◉ Image Captcha

○ Audio Captcha

4w86f

**Submit** **Reset** **Back**

- Mandatory fields are marked with an asterisk (*)
- The payment structure document if available will contain detailed instructions about the online payment process.
- Date specified(if any) should be in the format of 'ddmmyyyy'. Eg., 02082008
- For Amount fields, only numbers are allowed and for free text fields (mandatory), following special characters are allowed: . / @ - _ &

© State Bank of India